**सहज ...**

आपल्या डोळ्यांत भरलेला,

एकमेकांसाठीचा विश्वास...

अजूनच देतो बळ, आणि..

सोपे करतो श्वास !

कुठून येते ही समज,

अन दृढ होतात बंध ?

कधी उमलते फुल..

आणि वेढून घेतो गंध ?

न सांगता कळू लागते -

मौनाचीही भाषा.

कुठून कशा जुळतात बघ -

हातावरच्या रेषा !

एकमेकांना जपण्याचा,

अलिखित करार...

आयुष्याची नैय्या मग,

अलगद होते पार !

**- प्रीती देशपांडे**
**http://www.meetipreeti.com**